




दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक





• वर्ष : ०३ • अंक : १०७ • पुणे • सोमवार, दि. २९ डिसेंबर २०२५ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313

कार्यकर्त्यांनो उचला सतरंज्या 3



भाजपमध्ये बंडखोरी होण्याची शक्यता 4

## ठळक बातम्या

### पुण्यातील तापमानात चढ-उतार कायम

पुणे (आरंभ पर्व) : गेल्या काही दिवसांपासून पुणे शहरात थंडीचा प्रभाव कायम असून, पहाटे आणि रात्री गारठा अधिक तीव्रतेने जाणवत आहे. तापमानात चढ-उतार होत असला तरी थंडी कमी झालेली नाही. रविवारी (ता. २८) शहर व परिसरात किमान तापमान १०.१ अंश सेल्सिअस, तर कमाल तापमान २८ अंश सेल्सिअस नोंदविले गेले. वातावरणातील या चढ-उतारामुळे दिवसा ऊन आणि रात्री कडाक्याची थंडी असे संमिश्र हवामान आहे. भारतीय हवामानशास्त्र विभागाने दिलेल्या माहितीनुसार, पुढील दोन ते तीन दिवस हवामान स्थिर राहणार आहे. त्यामुळे किमान तापमानात फारसा बदल होण्याची शक्यता नाही. मात्र त्यानंतर पुढील तीन ते चार दिवसांत किमान आणि कमाल तापमानामध्ये किंचित वाढ होण्याची शक्यता आहे. परिणामी शहरातील किमान तापमान १२ अंश सेल्सिअसपर्यंत जाण्याची शक्यता आहे.

### ७२ वर्षाच्या वयोवृद्धाला अटक

पुणे (आरंभ पर्व) : ख्रिसमस पार्टी करण्याची बतावणी करुन एका १३ वर्षाच्या मुलीला जबरदस्तीने चॉकलेट खायला देऊन घरात घेऊन जाऊन तिचा विनयभंग करणाऱ्या एका ७२ वर्षाच्या वयोवृद्धाला काळे पडळ पोलिसांनी अटक केली आहे. कुतुबुद्दीन अली महंमद (वय ७२, रा. रहेजा व्हिस्टा सोसायटी, महंमदवाडी) असे अटक केलेल्या वयोवृद्धाचे नाव आहे. याबाबत या शाळकरी मुलीच्या आईने काळेपडळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ही घटना २४ डिसेंबर रोजी रात्री साडेआठ वाजता घडली होती. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी कुतुबुद्दीन महंमद याने फिर्यादी यांच्या १३ वर्षाच्या मुलीला आपण ख्रिसमस पार्टी करुया, तुला चॉकलेट देतो, असे बोलून तिला जबरदस्तीने चॉकलेट खायला दिले.

# अदानींसोबतच पवार कुटुंब एकत्र

## अदानी अन् माझे नाते बहीण-भावाचे; सुप्रिया सुळे यांच्याकडून कौतुक

**बारामती (दै. आरंभ पर्व)**

आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या देशातील पहिल्या अत्याधुनिक महाविद्यालयाचे उद्घाटन बारामतीत उद्योगपती गौतम अदानी यांच्या हस्ते रविवारी झाले. यावेळी उद्योगपती गौतम अदानींसोबतच ज्येष्ठ नेते शरद पवार, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह खासदार सुप्रिया सुळे एकाच व्यासपीठावर आले होते.

शरद पवार म्हणाले, गौतम अदानी यांचे अनेक क्षेत्रांमध्ये मोठे योगदान आहे. त्यांनी आज लाखो लोकांना रोजगार दिला आहे. त्यांनी समाजहिताच्या अनेक गोष्टी उभ्या केल्या आहेत. त्यांचे कर्तृत्व नव्या पिढीसाठी सांगणे आवश्यक आहे.

अजित पवार म्हणाले, गौतमभाईंनी १९८८ साली शून्यातून व्यवसायाची सुरुवात केली. आज त्यांच्या उद्योग समूहाचे २० देशांमध्ये कार्य सुरू आहे.



ते तीन लाख लोकांना रोजगार देतात. सुप्रिया सुळे म्हणाल्या की, ३० वर्षापासून पवार आणि अदानी कुटुंबाचे प्रेमाचे नाते आहे. माझ्यासाठी गौतम अदानी आणि त्यांच्या पत्नीचे मोठ्या भावाचे आणि वहिनीचे नाते आहे. उद्याचा भारत कसा असेल, याचा विचार अदानींनी मांडला, त्या विचारांनी पुढे गेल्यास देशातील बेरोजगारी हटविण्यात यश मिळेल, अशी माझी खात्री आहे, असे शरद पवार म्हणाले.

### मनमोकळ्या संवादाचे दर्शन

**बारामती येथील एआय सेंटरच्या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी खास शैलीत भाषणाची सुरुवात केली, ज्याने बारामतीकरांना हसवून टाकले. यावेळी उपमुख्यमंत्री पवार यांनी बारामतीच्या दोन्ही खासदार सुप्रिया सुळे, सुनेत्रा पवार, आमदार रोहित पवार यांचा उल्लेख खास शैलीत केला. पवार यांच्या या खास शैलीतील भाषणामुळे बारामतीकरांमध्ये हास्याचे वातावरण निर्माण झाले. यानिमित्ताने पवार कुटुंबातील मनमोकळ्या संवादाचे दर्शन घडले.**



## पुण्यात आरपीआयची फसवणूक?

- ‘जागा आरपीआयला, उमेदवार भाजपचा’ आरोपामुळे राजकीय खळबळ
- आरपीआय कार्यकर्त्यांमध्ये संतापाची लाट

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे शहरात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आरपीआय) संदर्भात फसवणूक झाल्याचा आरोप करत सोशल मीडियावर फिरणाऱ्या पोस्टमुळे राजकीय वातावरण तापले आहे. “जागा आरपीआयला, मात्र उमेदवार भाजपचा” असा थेट आरोप करत, आरपीआयची कोअर कमिटी गायब आहे का? असा सवाल उपस्थित करण्यात आला आहे.

या पोस्टमुळे पुणे शहरातील आरपीआय कार्यकर्त्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला असून, पक्ष संघटना आणि नेतृत्वाच्या भूमिकेबाबत उघडपणे नाराजी व्यक्त केली जात आहे. विशेषतः निर्णय प्रक्रियेत स्थानिक कार्यकर्त्यांना डावलले जात असल्याचा आरोप केला जात आहे.

आरपीआयच्या अनेक कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे की, पक्षाला मिळालेल्या जागेवर उमेदवार ठरवताना पारदर्शकता नाही. स्थानिक नेतृत्वाला विश्वासात घेतले गेले नाही, कोअर कमिटीची भूमिका संशयास्पद आहे. यामुळे पक्षाची ओळख आणि स्वाभिमान धोक्यात येत असल्याची भावना कार्यकर्त्यांमध्ये निर्माण झाली आहे. या आरोपांमुळे पुण्याच्या राजकीय वर्तुळात मोठी चर्चा सुरू झाली आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आरपीआय आणि भाजपमधील युतीतील अंतर्गत समन्वयावरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. काही नेत्यांनी यावर खुलासा करावा, अशी मागणी कार्यकर्त्यांकडून होत आहे. या संपूर्ण प्रकरणावर आरपीआयच्या वरिष्ठ नेतृत्वाची अधिकृत भूमिका काय? कोअर कमिटी खरोखर निष्क्रिय आहे का, की आरोप निराधार आहेत, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, या मुद्द्यावरून शहरातील राजकीय हालचाली अधिक तीव्र होण्याची चिन्हे आहेत.

# खानापूरमध्ये भर दिवसा दरोडा; लोकप्रतिनिधी आक्रमक

**खानापूर-विशाल भालेराव (दै. आरंभ पर्व)**

खानापूर परिसरात भर दिवसा घडलेल्या दरोड्याच्या घटनेमुळे हवेली तालुक्यातील खानापूरमध्ये एकच खळबळ उडाली आहे. गजबजलेल्या वेळेत घडलेल्या या प्रकारामुळे नागरिक, व्यापारी, महिला व ज्येष्ठ नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या घटनेनंतर लोकप्रतिनिधी व सामाजिक पदाधिकाऱ्यांनी एकत्र येत तीव्र नाराजी



व्यक्त केली आहे. दरोडेखोरांनी कोणतीही भीती न बाळगता, अगदी नियोजनबद्ध पद्धतीने काही मिनिटांत दरोडा टाकून पलायन केल्याने खानापूरमधील पोलीस गस्त, प्रतिबंधात्मक यंत्रणा व सीसीटीव्ही व्यवस्थेची कार्यक्षमता संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. सरपंच शिल्पा गायकवाड यांनी या घटनेवर तीव्र शब्दांत प्रतिक्रिया देताना सांगितले की, “खानापूरसारख्या शांत गावात भर दिवसा दरोडा पडणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. यामुळे महिलांमध्ये आणि व्यापाऱ्यांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. पोलीस प्रशासनाने तातडीने कठोर उपाययोजना करून नागरिकांचा विश्वास पुन्हा मिळवावा.” माजी सरपंच शरद (लालाशेठ) जावळकर यांनी व्यवस्थेवर प्रश्न उपस्थित करताना म्हटले की, “भर दिवसा दरोडा पडतो, याचा अर्थ गुन्हेगारांना कायद्याची भीती उरलेली नाही. केवळ गुन्ह्यानंतर तपास करून उपयोग नाही, तर गुन्हे होण्याआधी प्रतिबंधात्मक कारवाई झाली पाहिजे.” माजी पंचायत समिती सदस्य संजय जावळकर यांनी गस्त व्यवस्थेतील त्रुटींवर बोट ठेवत सांगितले की,

“बाजारपेठ, चौक आणि वर्दळीच्या ठिकाणी नियमित पोलीस गस्त पाहीजे. त्यामुळे गुन्हेगारांना मोकळे रान मिळत आहे. पोलीस प्रशासनाने तात्काळ गस्त वाढवून दृश्यमान बंदोबस्त ठेवावा.”

# शेळ्या–बोकड चोरी करणाऱ्या चोरट्यांना अटक

- रांजणगाव एमआयडीसी पोलिसांची दमदार कामगिरी; ५ गुन्हे उघडकीस
- चोरीस गेलेले जनावर शेतकऱ्यांना परत

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

रांजणगाव एमआयडीसी : रांजणगाव एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बाभुळसर खुर्द, करंजावणे, गणेगाव खालसा आणि वाघाळे या परिसरात शेतकऱ्यांच्या शेळ्या व बोकड चोरीच्या घटनांनी चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. मोटारसायकलवर येऊन जनावरे चोरणाऱ्या दोन चोरट्यांना रांजणगाव एमआयडीसी पोलिसांनी अटक करून एकूण पाच गुन्हे उघडकीस आणले आहेत. या प्रकरणी बाभुळसर खुर्द येथील शेतकरी माणिक रामभाऊ काळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला होता. याच पद्धतीने इतर शेतकऱ्यांच्या शेळ्या व बोकड चोरीस गेल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर एकूण पाच गुन्ह्यांची नोंद झाली होती. शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याने पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे यांनी गुन्हे उघडकीस आणण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक अविनाश थोरात, सहायक फौजदार दत्तात्रय शिंदे, पोलीस अंमलदार उमेश कुतवळ, योगेश गुंड, किशोर शिवणकर यांच्या पथकाने तपास सुरू केला. तपासादरम्यान शिरूर तालुका व अहिल्यानगर जिल्ह्यातील १५० पेक्षा अधिक सीसीटीव्ही कॅमेरे तपासण्यात आले तसेच तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपींचा माग काढण्यात आला. पोलीस अंमलदार योगेश गुंड यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे गव्हाणवाडी (ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर) परिसरातून मणेश कैलास ब्राम्हणे (वय २१), सुनिल अण्णाभाऊ माळी (वय २४) रा. गव्हाणवाडी या दोघांना अटक करण्यात आली.

# शिवतारेंच्या भूमिकेमुळे शिवसेनेत खळबळ

## बैठकीतून तडकाफडकी बाहेर पडले शहराध्यक्ष नाना भानगिरे - पडद्यामागे नेमकं काय घडलं?

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राज्यातील महानगरपालिका निवडणुकांचा बिगुल वाजला असून १५ जानेवारी रोजी मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर पुण्यातील राजकारण तापलं आहे. भाजप आणि शिवसेना (एकनाथ शिंदे गट) एकत्र लढणार, अशी चर्चा सुरू असतानाच शिवसेनेच्या अंतर्गत गोटात मोठा वाद उफाळून आला आहे. विजय शिवतारे यांच्या भूमिकेमुळे आज झालेल्या बैठकीत शिवसेनेचे शहराध्यक्ष नाना भानगिरे संतप्त झाले आणि बैठक अर्धवट सोडून तडकाफडकी बाहेर पडले.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पुण्यातील जागावाटप आणि उमेदवार निवडीवरून आजच्या बैठकीत तीव्र वाद झाला. विजय शिवतारे आणि नीलम गोऱ्हे यांनी आपल्या मर्जीतल्या उमेदवारांची यादी भाजपकडे दिल्याचा




आरोप नाना भानगिरे यांनी केला.

शिवसेनेकडून २५ उमेदवारांची यादी आधीच भाजपकडे देण्यात आली होती. मात्र, पुण्यासारख्या मोठ्या महानगरात किमान ३० ते ३५ जागांची मागणी व्हावी, असा ठाम आग्रह नाना भानगिरे यांनी धरला होता. याला विजय शिवतारे आणि नीलम गोऱ्हे यांनी विरोध केल्याने वाद अधिकच चिघळला.

बैठकीदरम्यान विजय शिवतारे यांच्या निकटवर्तीयांनाच उमेदवारी निश्चित केली जात असल्याचा थेट आरोप नाना भानगिरे यांनी केला. या मुद्द्यावरून वातावरण तापले, आवाज चढले आणि अखेर संतप्त नाना भानगिरे भावूक अवस्थेत बैठक सोडून बाहेर पडल्याचं समजतं. पुण्यात सुरुवातीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना गटाने भाजपसोबत निवडणूक लढवणार असल्याचं स्पष्ट झालं होतं. खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही याबाबत संकेत दिले होते. मात्र, भाजपकडून सन्मानजनक जागा मिळत नसल्याने नीलम गोऱ्हे यांनी आधीच नाराजी व्यक्त केली होती. सुरुवातीला शिवसेनेकडून ६० जागांची मागणी करण्यात आली होती, परंतु भाजप केवळ १२ जागा देण्याच्या भूमिकेत असल्याची चर्चा आहे. त्यामुळे महायुतीतील जागावाटप अद्यापही निश्चित झालेलं नाही.

आजच्या या नाट्यमय घटनेमुळे पुण्यातील शिवसेनेतील अंतर्गत कलह उघड झाला असून, विजय शिवतारे विरुद्ध नाना भानगिरे असा संघर्ष पुढील काळात अधिक तीव्र होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. उमेदवारी आणि जागावाटपावरून उभा राहिलेला हा वाद निवडणुकीआधीच शिंदे गटासाठी डोकेदुखी ठरणार का, याकडे राजकीय वर्तुळाचं लक्ष लागलं आहे.

भाजपाला मराठीचा तिरस्कार?

# मराठी महापौर का नको?

**शाईचा प्रवास | प्रतिक गंगणे**

**(दै. आरंभ पर्व)**

मुंबई ही केवळ आर्थिक राजधानी नाही, तर मराठी अस्मितेची श्वास घेणारी महानगरी आहे. या शहराच्या रस्त्यांपासून राजकारणापर्यंत मराठी माणसाने घाम गाळून उभारलेली ओळख आहे. मात्र आज मुंबईच्या महापौरपदाबाबत सुरू असलेल्या चर्चांमध्ये एक विचित्र आणि चिंताजनक प्रश्न पुढे येतो आहे. हिंदुत्व मान्य आहे, पण मराठी अस्मिता नको आहे का? भारतीय जनता पार्टी स्वतःला हिंदुत्वाचा मोठा झेंडा उचलणारा पक्ष म्हणून सादर करते. हिंदू अस्मितेचा आग्रह धरताना ती भूमिका अनेकदा आक्रमकही असते. परंतु मुंबईच्या बाबतीत प्रश्न उभा राहतो तो असा की, हिंदू चालतो, पण मराठी का नको? हिंदू ओळख मान्य असताना, त्या हिंदूची मातृभाषा. मराठी. आणि त्यातून आलेली सांस्कृतिक ओळख का दुय्यम ठरते?

मुंबईच्या कारभारात मराठी महापौर ही केवळ पदाची बाब नाही, तर ती या शहराच्या आत्म्याची ओळख आहे. महापौर म्हणजे फक्त प्रशासकीय चेहरा नव्हे; तो शहराच्या संस्कृतीचा, भाषेचा आणि इतिहासाचा प्रतिनिधी असतो. मग मुंबईसाठी मराठी माणूस का अडचणीचा ठरतो?

आज सत्तेच्या राजकारणात "हिंदू" ही ओळख सोयीची ठरते, कारण ती व्यापक आहे, मतांच्या गणितात उपयोगी आहे. पण "मराठी" ही ओळख विशिष्ट आहे. ती प्रश्न विचारते, हक्क मागते आणि स्थानिक स्वाभिमान जागवते. कदाचित म्हणूनच मराठी अस्मितेला बाजूला ठेवण्याचा प्रयत्न होत असावा.

मुंबईने नेहमीच बाहेरून येणाऱ्यांना स्वीकारले, पण त्याच वेळी मराठी माणसाने कधीही आपली ओळख सोडलेली नाही. गिरणी कामगारांपासून ते आजच्या आयटी कर्मचाऱ्यांपर्यंत, या शहराचा कणा मराठीच राहिला आहे. तरीही, सत्तेच्या वाटपात मराठी चेहरा टाळला जातो, हा गंभीर आहे. हा प्रश्न केवळ एका पक्षापुरता मर्यादित नाही; तो राजकीय मानसिकतेचा आरसा आहे. हिंदुत्वाचा वापर सत्तेसाठी आणि मराठी अस्मितेचा त्याग सोयीसाठी. हा दुहेरी निकष मुंबईला मान्य होईल का?

मुंबईचा महापौर हिंदू असायलाच हवा, यावर वाद नाही; पण तो मराठीही असायलाच हवा, कारण मुंबईची ओळख, इतिहास आणि आत्मा मराठीतूनच घडलेला आहे.

आज गरज आहे ती या प्रश्नावर स्पष्ट भूमिका घेण्याची. मुंबई ही कुणाची दया नाही, तर मराठी माणसाच्या कष्टांची देण आहे. त्यामुळे महापौरपदावर बसणारा चेहरा हिंदूही असो आणि मराठीही. ही अपेक्षा अन्यायकारक नाही, तर न्याय्य आहे.

## चार दिवसांत ९,१०१ नामनिर्देशन फॉर्मची विक्री

- **नगर रोड–वडगाव शेरी कार्यालय आघाडीवर**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या आदेशानुसार पुणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक सन २०२५-२६ चा कार्यक्रम जाहीर झाला असून, शहरातील ४१ प्रभागांतून १६५ नगरसेवकांची निवड होणार आहे. या निवडणुकीसाठी १५ निवडणूक निर्णय अधिकारी यांची कार्यालये स्थापन करण्यात आली आहेत.

निवडणूक प्रक्रियेअंतर्गत दि. २३ डिसेंबर ते २७ डिसेंबर २०२५ या कालावधीत एकूण ९,१०१ नामनिर्देशन फॉर्मची विक्री करण्यात आली आहे. यामध्ये दि. २७ डिसेंबर रोजी एकाच दिवशी १,२०६ नामनिर्देशन फॉर्मची विक्री झाल्याची माहिती निवडणूक कार्यालयाकडून देण्यात आली. आजच्या दिवशी सर्वाधिक नामनिर्देशन फॉर्म विक्री नगर रोड–वडगाव शेरी निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात (१३१) झाली. तर सर्वात कमी विक्री कोथरूड–बावधन आणि औंध–बाणेर कार्यालयांत (प्रत्येकी ४५) नोंदविण्यात आली. दि. २७ डिसेंबर रोजी विविध निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयांमधील नामनिर्देशन फॉर्म विक्रीचा तपशील पुढीलप्रमाणे आहे –

येरवडा–कळस–धानोरी (४६), नगर रोड–वडगाव शेरी (१३१), कोथरूड–बावधन (४५), औंध–बाणेर (४५), शिवाजीनगर–घोले रोड (९१), कै. बा. स. ढोले पाटील रोड (६४), हडपसर–मुंढवा (७५), वानवडी–रामटेकडी (८१), बिबवेवाडी (७६), भवानी पेठ (८५), कसबा–विश्रामबाग वाडा (५३), वारजे–कर्वेनगर (१२६), सिंहगड रोड (९६), धनकवडी–सहकारनगर (११८) आणि कोंढवा–येवलेवाडी (७४).

## थोडक्यात पण महत्वाचे



### खानापूरच्या महात्मा गांधी विद्यालयात माजी विद्यार्थी संघाची स्थापना

**खानापूर-विशाल भालेराव (आरंभ पर्व) : खानापूर येथील पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या महात्मा गांधी विद्यालयामध्ये माजी विद्यार्थी संघाची स्थापना करण्यात आली. माजी विद्यार्थी संघाकडून शाळेच्या भौतिक सुविधा व पुरक सुविधा उभारणी करण्यावर तसेच विद्यार्थी गुणवत्ता विकासावरही भर देण्यात येईल असे नवनियुक्त सदस्यांकडून भावना व्यक्त करण्यात आले.माजी विद्यार्थी संघात अध्यक्ष अमोल आबासाहेब जावळकर,उपाध्यक्ष प्रविण पारगे,सचिव मुख्याध्यापक शिवराम साबळे,कोषाध्यक्ष नंदकुमार जावळकर,सेवानिवृत्त शिक्षक शशिकांत जाधव,सेवानिवृत्त अधिकारी अरुण माताळे,सल्लागार सदस्य लक्ष्मण माताळे,शरद जावळकर,शशिकांत किवळे, तानाजी भोसले,पालक प्रतिनिधी आत्माराम जावळकर,वंदना शेडे म्हणून निवड करण्यात आले. मुख्याध्यापक शिवराम साबळे यांनी माजी विद्यार्थी संघांत निवड झाल्याबद्दल सर्व प्रतिनिधींचे अभिनंदन व स्वागत केले.माजी विद्यार्थी संघ सभेस विद्यालयाचे प्रथम विद्यार्थी रघुनाथ यादव, बाबासाहेब शिंदे,नितीन वाघ, सुधाकर गायकवाड,विश्वनाथ जावळकर,धनंजय सपकाळ,सागर माने,कालिदास माताळे,मनोहर जावळकर,राहुल जावळकर,अमोल तुकाराम जावळकर,रामदास जावळकर,अंजना जावळकर, विश्वास जाधव,अशोक सपकाळ, दत्तात्रय जाधव आदी उपस्थित होते. विद्यालयाचे जेष्ठ शिक्षिका ज्योत्स्ना गुरव,भीमराव आदलिंग,भगवान मदने,डॉ.कीर्ती जाधव,विपुल व्हावळ,नूतन ओतुरकर,मीरा कदम,सुजाता भोसले,अपर्णा आढाव,विजय सुरवसे,रमेश कोळी, शितल वरपे,लोणकर,मोरे,मोकाशी आदी शिक्षक-शिक्षकेत्तर सहकारी उपस्थित होते.**

### व्यवसाईकांना विनाकारण वेटीस धरू नका - मा . उपसरपंच संदिप मते



**खडकवासला-विशाल भालेराव (आरंभ पर्व) : खडकवासला - खडकवासला धरणाच्या धरण चौपटीकडे जाणाऱ्या कडेणे रोडवर राष्ट्रीय सार्वजनिक बांधकाम विभागाकडून (NHAI/ सार्वजनिक बांधकाम विभाग) रस्त्याच्या कडेला खांब बसवण्यात आले आहेत. मात्र, या खांबांचा अंतर (डिस्टन्स) आणि प्रत्यक्ष रस्त्याची रुंदी यामध्ये मोठी तफावत आढळून येत असून, त्यामुळे परिसरातील हातगाडी व छोटे व्यावसायिक अडचणीत सापडले आहेत. या खांब बसवणीमुळे रस्त्याची उपयोगी जागा कमी झाली असून हातगाडी, फेरीवाले तसेच लहान व्यावसायिकांना आपला व्यवसाय करणे कठीण बनले आहे. यामुळे प्रशासनाकडून यावसाईकांना विनाकारण वेटीस धरले जात असल्याची भावना निर्माण झाली आहे. यासंदर्भात माजी सरपंच संदिप मते यांनी तीव्र नाराजी व्यक्त करताना सांगितले की, "रस्त्याच्या मोजमापानुसार खांब बसवलेले नसून, चुकीच्या पद्धतीने केलेल्या कामामुळे हातगाडीवाल्यांची पिळवणूक होत आहे. प्रशासनाने तातडीने याची दखल घेऊन सुधारणा करावी. अन्यथा स्थानिक व्यावसायिकांवर अन्याय होईल." धरण परिसर हा पर्यटनदृष्ट्या तसेच स्थानिक रोजगाराच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. अशा ठिकाणी कोणतीही विकासकामे करताना स्थानिक यावसाईकांचा विचार होणे गरजेचे आहे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. संबंधित विभागाने प्रत्यक्ष पाहणी करून खांबांचा योग्य डिस्टन्स निश्चित करावा व हातगाडी तसेच छोटे व्यावसायिक यांना दिलासा द्यावा, अन्यथा आंदोलनाचा इशाराही स्थानिकांकडून दिला जात आहे.**

## प्रदूषित पाण्याला पिण्यायोग्य बनवणाऱ्या यंत्रणेचे प्रभावी प्रात्यक्षिक

- **पुण्यातील डॉ. करण चव्हाण यांचे संशोधन**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सध्याच्या काळात अतिशय गंभीर असलेल्या पाणी आणि हवेचे प्रदूषण या समस्यांवर अद्ययावत तंत्रज्ञानाच्या आधारे शक्य असल्याचे सिद्ध करणारे प्रात्यक्षिक 'इको आईस'च्या वतीने बोट क्लब येथे आज सादर करण्यात आले.

यावेळी प्रोजेक्ट ड्रॉपलेट आणि जलशुद्धी या प्रकल्पांचे सादरीकरण करण्यात आले. प्रोजेक्ट ड्रॉपलेटद्वारे सौर ऊर्जा आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधारे बोटीचा वापर करून नदी व अन्य जलस्रोतांमधील पाण्याची शुद्धता, प्रदूषणाचे प्रमाण आणि अन्य पर्यावरणीय परीक्षण केले जाते. पाण्यातील परिसंस्थेची संबंधित माहिती त्वरित डॅशबोर्डवर उपलब्ध होते. फ्लुईड ऍनालिटिक्सच्या सहकार्याने हा प्रकल्प विकसित करण्यात आला असून वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम कडून सन 2024 चे को प्रोन्युअर ऑफ द इयर हे आंतरराष्ट्रीय मानांकन प्राप्त झाले आहे, अशी माहिती 'इको आईस'चे संस्थापक अध्यक्ष डॉ करण चव्हाण यांनी दिली. यावेळी विद्या प्रतिष्ठान च्या संचालक रजनी इंदुलकर, अतुल चंद्र, श्रुती बापट आदि मान्यवर उपस्थित होते.

## शरद लाला जावळकर मैदानात; खानापूर गणात प्रचाराची आघाडी

### विरोधक अजून गुलदस्त्यातच; घरोघरी प्रचारामुळे राजकीय वातावरण तापले

**सिंहगड -विशाल भालेराव (दै. आरंभ पर्व)**

आगामी जिल्हा परिषद–पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सिंहगड परिसरातील राजकीय हालचालींना वेग आला असून, खानापूर गणातील बालेकिल्ल्यावर वर्चस्व सिद्ध करण्यासाठी माजी सरपंच शरद लाला जावळकर पूर्ण ताकदीनिशी मैदानात उतरले आहेत. महायुती होणार की नाही, उमेदवारीचे अंतिम गणित कसे ठरणार, याबाबत पक्षपातळीवर चर्चा सुरू असतानाच जावळकर यांनी कोणतीही प्रतीक्षा न करता पक्षाचे काम निश्चित करून प्रचाराला सुरुवात करत आघाडी घेतली आहे.




संपूर्ण परिसरात निवडणुकीची चाहूल लागल्याचे चित्र स्पष्टपणे दिसून येत असून, खानापूर गणामध्ये सध्या राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. विरोधी गटाकडून अद्याप अधिकृत उमेदवार जाहीर न झालेला असतानाच शरद लाला जावळकर यांनी आक्रमक पवित्रा घेत मतदारांशी थेट संवाद साधण्याची रणनीती आखली आहे.

**घरोघरी भेटी, वैयक्तिक संवाद, प्रचार फेऱ्या :** प्रचार थेट मतदारांच्या दारात नेण्यावर भर देत घरोघरी भेटीगाठी, वैयक्तिक संवाद, प्रचार फेऱ्या आणि स्थानिक प्रश्नांवर चर्चा अशा माध्यमातून जावळकर जनतेपर्यंत पोहोचत आहेत. घरातील, वाड्या-वस्त्यांवरील समस्या ऐकून घेणे, पूर्वी केलेल्या कामांचा आढावा मांडणे आणि पुढील विकासाचा आराखडा मांडत विश्वासार्ह नेतृत्वाची प्रतिमा अधिक ठळकपणे पुढे आणण्याचा प्रयत्न सुरू आहे.

खानापूर गणामध्ये जावळकर यांच्या सक्रिय प्रचारामुळे निवडणूक लढत रंगतदार होण्याची चिन्हे दिसत असून, विरोधकांवर अप्रत्यक्ष दबाव वाढल्याचे चित्र आहे. अद्याप विरोधक गुलदस्त्यात असताना जावळकरांनी घेतलेली आघाडी ही आगामी निवडणुकीत निर्णायक ठरते का, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

## या पक्षातून त्या पक्षात; लाजेचं काहीच नाही का?

**शाईचा प्रवास | प्रतिक गंगणे**





**(दै. आरंभ पर्व)**

राजकारणात मतभेद असतात, भूमिका बदलतात, विचारधारा विकसित होते. हे लोकशाहीचं सौंदर्य आहे. पण विचार बदलणे आणि संधीसाठी रंग बदलणे यामध्ये मूलभूत फरक आहे. आज महाराष्ट्राच्या आणि विशेषतः स्थानिक स्वराज्य संस्थांच्या राजकारणात जे सुरू आहे, ते विचारपरिवर्तन नाही; ती आहे कोलांडी उडी संस्कृती. पक्ष, चिन्ह, घोषणा, झेंडे सगळं बदलत राहणारी, पण स्वतःचा फायदा अबाधित ठेवणारी.

आज "माजी" आणि "आजचे" नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते. सत्तेचा वास आला की एका रात्रीत दुसऱ्या पक्षात दाखल होतात. कालपर्यंत ज्यांच्यावर भ्रष्टाचाराचे, घराणेशाहीचे, लोकविरोधी धोरणांचे आरोप केले, त्याच पक्षाच्या व्यासपीठावर आज मिरवताना लाज कशी वाटत नाही? हा प्रश्न सामान्य नागरिकांच्या मनात घुमतो आहे.

मतदार एखाद्या उमेदवाराला फक्त व्यक्ती म्हणून नाही, तर विचार, भूमिका आणि पक्षाच्या ओळखीवर मत देतो. निवडणूक जिंकल्यानंतर त्याच मताचा आधार घेऊन दुसऱ्या पक्षात जाणे म्हणजे मतदाराच्या विश्वासावर थेट घाला. ही केवळ राजकीय कसरत नाही; ही लोकशाहीची फसवणूक आहे.

कधी काळी पक्ष बदलणे ही गंभीर बाब मानली जात होती. आज ती सामान्य, स्वस्त आणि निर्लज्ज झाली आहे. पक्षप्रवेशाचे कार्यक्रम म्हणजे जणू बाजारातली खरेदी-विक्री. घोषणा बदलतात, विचार बदलतात, पण सत्तेची लालसा मात्र कायम राहते.

कोलांडी उड्या थांबवायच्या असतील तर कायदे, नियम यांच्यापेक्षा मतदारांची जागरूकता महत्त्वाची आहे. प्रश्न विचारले गेले पाहिजेत. काल काय म्हणत होतात? आज काय म्हणत आहात?

विचार बदलले की फक्त सोय? जोपर्यंत मतदार अशा उड्या मारणाऱ्यांना पुन्हा पुन्हा निवडून देतो, तोपर्यंत लाज वाटण्याचं कारणच उरणार नाही. आणि मग राजकारण विचारांचं न राहता, केवळ सत्तेच्या उड्या मारण्याचा खेळ बनून राहील.

### इतकंच सर्वस्व?

**कोलांडी उडी मारणाऱ्यांचे समर्थन नेहमी एकसारखे असते. "विकासासाठी", "परिसराच्या भल्यासाठी", "संधी मिळावी म्हणून." खरंच का? मग प्रश्न असा उरतो की, कालपर्यंत विकास थांबवणारा पक्ष आज अचानक विकासाचा महामार्ग कसा झाला? उत्तर स्पष्ट आहे. सत्ता जवळ असेल तिथे विकासाचे कारण पुढे केले जाते. वास्तविक, विकास हा पक्ष बदलल्याने नाही, तर प्रामाणिक इच्छाशक्तीने होतो. पण इच्छाशक्तीपेक्षा सत्तेची जवळीक अधिक महत्त्वाची ठरू लागली आहे.**

### कार्यकर्त्यांचं काय?

- **नेते उड्या मारतात, पण खालच्या स्तरावरील निष्ठावान कार्यकर्त्यांचे काय?**
- **ज्यांनी झेंडे लावले, सभा घेतल्या, टीका सहन केली, पोलिसांची धक्काबुक्की झेलली. ते कार्यकर्ते एका रात्रीत "चुकीच्या पक्षात" ठरतात. त्यांच्या निष्ठेची किंमत शून्य होते. आणि मग तेच नेते नव्या पक्षात गेले की कार्यकर्त्यांना उपदेश. "तुम्हीही या, विकास होईल."**
- **ही निष्ठेची अवहेलना नाही तर काय?**

### लाज वाटायला हवी पण कोणाला?

- **लाज वाटायला हवी.**
- **कालपर्यंत शिव्या घातलेल्या पक्षाच्या मंचावर आज टाळ्या वाजवणाऱ्यांना**
- **मतदारांचा विश्वास वापरून स्वतःचा फायदा करून घेणाऱ्यांना**
- **निष्ठेच्या नावाने कार्यकर्त्यांना झुलवत ठेवणाऱ्यांना**
- **पण दुर्दैव असे की, लाज ही आता राजकारणात अडथळा मानली जाते; आणि निर्लज्जपणा ही कौशल्य!**

## खेडशिवापूर परिसरात जुगार अड्ड्यावर राजगड पोलिसांची धडक



- **२७ हजारांची रोकड जप्त**

**भोर (दै. आरंभ पर्व)**

खेडशिवापूर परिसरात सुरू असलेल्या अवैध जुगारावर कारवाई करत राजगड पोलीस स्टेशनच्या पथकाने धडक छापा टाकून दोन जणांना रंगेहाथ पकडले. या कारवाईत २७ हजार रुपयांची रोकड व जुगाराचे साहित्य जप्त करण्यात आले आहे. मात्र, या एकाच कारवाईने समाधान न मानता हायवे व ग्रामीण भागातील सर्व अवैध धंद्यांवर कायमस्वरूपी आळा घालावा, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

ही कारवाई दि. २६ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी सुमारे सहा वाजता खेडशिवापूर (ता. हवेली, जि. पुणे) येथील कोंढणपूर फाटा परिसरात, मुक्तांगण हॉटेलच्या पाठीमागील मोकळ्या जागेतील पत्र्याच्या शेडमध्ये करण्यात आली. पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार छापा टाकण्यात आला असता जुगार सुरू असल्याचे उघड झाले.

तपासात बसवराज तुकाराम भुसारे (रा. पिंपरी-चिंचवड) हा राजु किसन कोंडे (रा. खेडशिवापूर) यांच्या सांगण्यावरून स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी जुगार खेळवत असल्याचे निष्पन्न झाले. आरोपींकडे विशिष्ट आकड्यांचे चार्ट असून, त्याच्या आधारे आकडे देत जुगार खेळवला जात होता. छाप्यात २७ हजार रुपये रोख रक्कम तसेच जुगाराचे साहित्य पोलिसांनी ताब्यात घेतले. संबंधितांवर महाराष्ट्र जुगार कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

दरम्यान, हायवे लगत व काही ग्रामीण भागांमध्ये जुगार, अवैध व्यवसाय व इतर दोन नंबरचे धंदे अजूनही खुलेआम सुरू असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. मोकळ्या जागा, हॉटेलच्या पाठीमागील परिसर व तात्पुरत्या शेडमध्ये असे धंदे सुरू असल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनत असल्याची चिंता व्यक्त होत आहे.

"एक-दोन कारवायांपुरते मर्यादित न राहता राजगड पोलीस स्टेशनने विशेष सर्वेक्षण करून हायवे पट्ट्यातील सर्व अवैध धंद्यांचा समूळ नायनाट करावा," अशी ठाम मागणी नागरिकांकडून केली जात आहे. या प्रकरणाची पोलीस अधीक्षक कार्यालयाने तातडीने दखल घेऊन ठोस व परिणामकारक कारवाईचे आदेश द्यावेत, अन्यथा सामाजिक गुन्हेगारी वाढण्याची शक्यता नाकारता येणार नाही, अशी भीतीही व्यक्त होत आहे.

## सणासुदीचा काळ आरोग्यदायी वळणासह साजरा करा : डार्क चॉकलेट बदाम संत्रा केक

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

या नववर्षात बदाम पीठ, समृद्ध डार्क चॉकलेट, ताज्या संत्र्याची साल आणि मेपल सिरप यांचे सुंदर मिश्रण असलेल्या डार्क चॉकलेट बदाम संत्रा केकसह आपल्या साजऱ्या उत्सवांमध्ये उबदारपणा आणि तृप्तीचा स्पर्श जोडा. शेफ कविता सिंग यांनी काळजीपूर्वक तयार केलेली ही रेसिपी सणासुदीच्या चवींना सजग बेकिंगसह संतुलित करते.

तूप आणि अंड्यांचा वापर करून, आणि बदामाच्या पिठापासून बनवलेला हा केक मऊ आणि ओलसर असतो, ज्यात चॉकलेट आणि लिंबूवर्गीय फळांची समृद्ध चव असते. हा एक पौष्टिक पण स्वादिष्ट वर्षाअखेरचा मिष्टान्न आहे, जो बनवायला सोपा, इतरांसोबत वाटून घेण्यासाठी उत्तम आणि सणासुदीच्या बेकिंगची एक आधुनिक आवृत्ती आहे.



सणासुदीतील आहाराविषयी आपले मत मांडताना, मॅक्स हेल्थकेअर येथील डायटेटिक्स विभागाच्या प्रादेशिक प्रमुख ऋतिका सामद्दार सांगतात, "सणासुदीचे अन्न म्हणजे अतिरेक किंवा तडजोड असायलाच हवी असे नाही. कॅलिफोर्निया बदाम हे प्रथिने, फायबर, निरोगी फॅट्स, व्हिटॅमिन E आणि आवश्यक खनिजांचे नैसर्गिक स्रोत आहेत, त्यामुळे ते सणासुदीच्या रेसिपींमध्ये एक शहाणपणाची भर ठरतात. ते हृदयाच्या आरोग्यास आधार देतात, दीर्घकाळ ऊर्जा टिकवण्यास मदत करतात आणि तृप्तीची भावना निर्माण करतात—जी सुट्टीच्या काळात विशेषतः महत्त्वाची असते, जेव्हा खाण्याचा अतिरेक वाढतो. बेकिंगमध्ये बदामांचा वापर केल्याने साजरेपणाचा आनंद घेतानाच एकूण पोषण आणि आरोग्याला पाठबळ देता येते."समृद्ध, दिलासा देणारा आणि सणासुदीचा आनंद देणारा हा केक सुट्टीच्या काळासाठी परिपूर्ण डेझर्ट ठरतो—तृप्तीदायक असूनही संतुलित, अगदी या ऋतूसाठी योग्य. असा केक कसा तयार करायचा, ज्यामुळे प्रत्येकजण पुन्हा-पुन्हा चाखायला येईल, ते पुढे पाहूया:

डार्क चॉकलेट बदाम संत्रा केक तयारीसाठी लागणारा

वेळ: ६० मिनिटे

सर्व्हिंग्ज: ८-इंच केक (सुमारे १० स्लाइस)

साहित्य:

- बदामाचे पीठ – २ कप (१८० ग्रॅम)
- अंडी – ४ मध्यम आकाराची (१९६ ग्रॅम)
- डार्क चॉकलेट – १/२ कप (१०० ग्रॅम)
- मेपल सिरप – १/२ कप (११३ मि.ली.)
- तूप – १/४ कप (४० मि.ली.)
- ताज्या संत्र्याची किसलेली साल (ऑरेंज झेस्ट) – १ टेबलस्पून (४ ग्रॅम)
- संत्र्याचा रस – १/४ कप (४७ मि.ली.)
- व्हॅनिला एसन्स – १ टीस्पून (५ मि.ली.)
- बेकिंग पावडर – १ टीस्पून (३.८४ ग्रॅम)
- मीठ – चिमूटभर (०.१ ग्रॅम)

कृती :

- एका भांड्यात बदामाचे पीठ, बेकिंग पावडर आणि मीठ एकत्र करून कोरडे साहित्य तयार करा.
- दुसऱ्या भांड्यात अंडी फोडा, त्यात मेपल सिरप, व्हॅनिला एसन्स आणि संत्र्याचा रस घालून चांगले फेटा, जेणेकरून ओले साहित्य तयार होईल.
- डार्क चॉकलेट वितळवा (मायक्रोवेव्हमध्ये किंवा डबल बॉयलिंग पद्धतीने), त्यात संत्र्याची किसलेली साल आणि तूप घाला.
- कोरडे आणि ओले साहित्य एकत्र करून नीट मिसळा.
- तयार बॅटर ८-इंच केक टिनमध्ये ओता आणि वरून हलके टॅप करून समतल करा.
- आधी गरम केलेल्या ओव्हनमध्ये १८० अंश तापमानावर ४५ मिनिटे बेक करा.
- केक बाहेर काढून पूर्णपणे थंड होऊ द्या.
- स्लाइस कापा आणि सर्व्ह करा.

संपादक-पत्रकारांसाठी
धमाका ऑफर
वायरलेस बूम माईक
फक्त ₹2999 मध्ये
मुख्य वैशिष्ट्ये:
- वायरलेस बूम (माईक)
- 30 मीटरपर्यंत अगदी क्रिस्टल क्लिअर आवाज
- एका चार्जिंगवर तब्बल १२ तास बॅकअप
- लाइटवेट बूम स्टँड
- प्रोफेशनल बूम डिझाईन
- अँड्रॉइड, आयफोन आणि कॅमेरा सपोर्ट
- माईक कव्हर + चार्जिंग वायर + बूम स्टिक
- माईक व बूमवर तुमचे चॅनल लोगो/ब्रँड प्रिंट
- चॅनल नाव व लोगोचे पूर्ण कस्टमाइजेशन
- स्पेशल बूम बॅग मोफत
• ऑर्डर दिल्यावर ३ दिवसात बूम तयार
• शहराच्या कुठल्याही कानाकोपऱ्यात घरपोच डिलिव्हरी
• हाय-स्पीड सर्व्हिस उपलब्ध
आता लगेच बुक करा – तुमचे रिपोर्टिंग होईल अजून प्रोफेशनल!
मुख्य कार्यालय
दै. आरंभ पर्व कार्यालय, फ्लॅट नं. १६, चौथा मजला, सोमेश्वर अपार्टमेंट ए, धायरी फाटा, सिंहगड रोड, वडगाव बुद्रुक, शिंदे/अदाते हॉस्पिटल लेन, त्रिमूर्ती हॉस्पिटल समोर, पुणे - ४११०४१
7276314142
8657865702


दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
सोमवार, दि. २९ डिसेंबर २०२५



OFFER... OFFER... OFFER
संपादक-पत्रकारांसाठी
धमाका ऑफर
युट्युब चॅनल साठी खास
शॉर्ट व्हिडिओ (रील्स) पॅकेज
- शॉर्ट व्हिडिओ हे दै. आरंभपर्व कडून बनवले जातील
- शॉर्ट व्हिडिओंमध्ये राजकीय बातम्या, व्हायरल व्हिडिओ असतील
- कालावधी – फक्त १ ते ३ मिनिटे
- चॅनल रिचनुसार ऑटोमॅटिक व्हायरल होणार
- VIEWS आणि SUBSCRIBE वाढवण्यास मदत
- शॉर्ट व्हिडिओंमधून पेमेंट कमाईची संधी
फक्त : 8000 रुपये / महिना
(रोज ५ शॉर्ट व्हिडिओ - २६ दिवस)
मुख्य कार्यालय
दै. आरंभ पर्व कार्यालय, फ्लॅट नं. १६, चौथा मजला, सोमेश्वर अपार्टमेंट ए, धायरी फाटा, सिंहगड रोड, वडगाव बुद्रुक, शिंदे/अदाते हॉस्पिटल लेन, त्रिमूर्ती हॉस्पिटल समोर, पुणे - ४११०४१
7276314142
8657865702

# कार्यकर्त्यांनो उचला सतरंज्या

**शाईचा प्रवास | प्रतिक गंगणे**



**(दै. आरंभ पर्व)**

राजकारणात कार्यकर्ता हा शब्द कधी काळी अभिमानाचा, त्यागाचा आणि निष्ठेचा प्रतीक होता. गावागावात, वॉर्डावॉर्डात पक्ष उभा राहिला तो कार्यकर्त्यांच्या घामावर, वेळेवर आणि विश्वासावर. पण आजच्या राजकारणात कार्यकर्त्यांची भूमिका हळूहळू बदलत चालली आहे. आणि ती बदलत नाहीये, तर संकुचित केली जात आहे.

आज कार्यकर्त्याला मत मागण्यासाठी, सभा जमवण्यासाठी, पोस्टर लावण्यासाठी, गर्दी गोळा करण्यासाठी आठवण काढली जाते. पण निर्णय घेण्याची वेळ आली, उमेदवारी ठरवायची वेळ आली, किंवा सत्तेचा वाटा वाटायची वेळ आली. तेव्हा कार्यकर्ता बाजूला ढकलला जातो. त्याच्यासाठी उरते ते फक्त सतरंज्या उचलण्याचं काम.

बाहेरून आलेले 'आयाराम-गयाराम', पैशाची ताकद असलेले, संधीसाधू चेहरे एका रात्रीत नेते बनतात. वर्षानुवर्षे झेंडे वाहणारा, घोषणा देणारा, पक्षासाठी अपमान सहन करणारा कार्यकर्ता मात्र "नंतर पाहू" या आश्वासनावरच अडकून राहतो. नंतर कधीच येत नाही. येते ती फक्त पुढची सभा, पुढची मोर्चेबांधणी आणि पुन्हा सतरंज्या.

हे केवळ अन्यायकारक नाही, तर धोकादायकही आहे. कारण कार्यकर्त्यांचा आत्मसन्मान गमावलेला पक्ष फार काळ टिकत नाही. कार्यकर्ते म्हणजे फक्त माणसं नाहीत; ते पक्षाची मुळे असतात. मुळेच सुकली, तर झाड कितीही मोठं दिसलं तरी ते कोसळणारच.

आज अनेक कार्यकर्ते मनातल्या मनात संतप्त आहेत. उघड बोलत नाहीत, कारण त्यांना पक्षावर प्रेम आहे. पण हे प्रेम एकतर्फी ठरत असेल, तर प्रश्न विचारणं गरजेचं आहे.

**आपण फक्त सतरंज्याच उचलण्यासाठी आहोत का? आपला घाम, वेळ, आयुष्य याची किंमत फक्त एवढीच आहे का?**

राजकारणात निष्ठेला जागा नसेल, तर कार्यकर्त्यांनीही आत्मपरीक्षण करायला हवं. सतरंज्या उचलणं वाईट नाही; पण नेहमीच फक्त सतरंज्याच उचलायला लावणं ही मानसिक गुलामगिरी आहे. कार्यकर्त्यांनी प्रश्न विचारले पाहिजेत, हक्क मागितले पाहिजेत आणि गरज पडली तर "हो" म्हणण्याऐवजी "का?" म्हणायला शिकले पाहिजे.

कारण लोकशाहीत सर्वात मोठी ताकद सत्ताधाऱ्यांची नाही.

ती आहे जाणिवेच्या कार्यकर्त्यांची. आणि जो कार्यकर्ता जागा झाला, तो फक्त सतरंजी उचलत बसत नाही. तो इतिहास घडवतो.

## आरंभ इफेक्ट : जिर्ण विद्युत तारा बदलण्याचे काम सुरु

**सांगरुण-विशाल भालेराव (दै. आरंभ पर्व)**

सांगरुण - मौजे सांगरुण येथील विद्युत खांबांवरील लोंबकळणाऱ्या व जिर्ण झालेल्या विद्युत ताऱ्यांमुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. याबाबत "सांगरुण गावात लोंबकळणाऱ्या विद्युत तारा" या मथळ्याखाली 'आरंभपर्व'ने वृत्त प्रसिद्ध करताच महावितरण विभागाने तात्काळ दखल घेतली आहे.

**"तारा बदलण्याचे काम सुरु झाल्याने काहीसा दिलासा मिळाला आहे. मात्र जिर्ण पोल व संपूर्ण काम पूर्ण झाल्यानंतरच पूर्ण सुरक्षितता मिळेल," - विकी अशोक मानकर, ग्रामस्थ, सांगरुण**




महावितरण कार्यालयाकडून मिळालेल्या माहितीनुसार, सन १९७० मध्ये बसविण्यात आलेल्या आणि आता पूर्णतः जिर्ण झालेल्या विद्युत तारा बदलण्याचे काम दिनांक २४ पासून सुरु करण्यात आले आहे. हे काम पहिल्या टप्प्यात पूर्ण केले जाणार असून, दुसऱ्या टप्प्यात जिर्ण विद्युत खांब बदलणे तसेच खांबांची उंची वाढविण्याचे काम हाती घेतले जाणार असल्याचे आश्वासन महावितरणकडून देण्यात आले आहे.


'आरंभपर्व'च्या बातमीमुळे महावितरणने तातडीने हालचाल करत तारा बदलण्याचे काम सुरु केले असले, तरी जिर्ण पोल, नवीन तारा व इतर सुरक्षाविषयक कामे पूर्ण होईपर्यंत पाठपुरावा सुरुच ठेवणार असल्याचे ग्रामस्थांनी स्पष्ट केले आहे. या कारवाईमुळे ग्रामस्थांमध्ये समाधान व्यक्त होत असून, माध्यमांच्या प्रभावामुळे प्रशासन हलते, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
WE ARE HIRING!
Open Position
VIDEO EDITOR
आपला बायोडाटा खालील ईमेलवर पाठवावा.
for Video Editor असा स्पष्ट उल्लेख करावा.
aparvinfo@gmail.com & ganganepratik4@gmail.com
Call Now ७२७६३१४१४२

## जन्मजात यकृत आजाराने त्रस्त मुलांसाठी वेळेवर होणारे ट्रान्सप्लांट कसे बदलू शकते संपूर्ण आयुष्य

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जन्मजात यकृत आजाराने त्रस्त मुलांमध्ये वारंवार काविळ, फिक्कट किंवा राखाडी रंगाची विष्ठा, पोटाचा आकार असामान्यपणे वाढणे किंवा वजन योग्यरित्या न वाढणे अशी लक्षणे दिसून येतात. या रोगांचे सर्वात सामान्य कारण 'बिलियरी एट्रेसिया' (Biliary Atresia) हे असते, ज्यामध्ये पित्त बाहेर वाहून नेणाऱ्या नलिका एकतर



विकसित होत नाहीत किंवा बंद होतात. याशिवाय पित्त प्रवाहाशी संबंधित इतर समस्या आणि काही जेनेटिक मेटाबॉलिक लिव्हर डिसीजेस देखील यासाठी जबाबदार असू शकतात, ज्यामध्ये एन्झाईम्सच्या कमतरतेमुळे यकृताचे गंभीर नुकसान होते.

हे आजार केवळ मुलाच्या शारीरिक वाढीत अडथळा आणत नाहीत, तर त्यांच्या मानसिक विकासावरही विपरीत परिणाम करतात. त्यामुळे अशा मुलांना तात्काळ आणि विशेष पीडियाट्रिक लिव्हर केअरची आवश्यकता असते. योग्य वेळी तज्ज्ञांकडून उपचार मिळाल्यास मुले केवळ आजारातून सावरत नाहीत, तर आपल्या वयाच्या इतर मुलांप्रमाणे आवश्यक 'ग्रोथ माईलस्टोन्स' देखील गाठू शकतात.

नानावटी मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, मुंबई येथील इन्स्टिट्यूट ऑफ लिव्हर, इंटेस्टाईन अँड पॅनक्रियास सायन्सेसमधील पीडियाट्रिक हेपेटोलॉजीचे असोसिएट डायरेक्टर, डॉ. ललित वर्मा यांनी सांगितले: "जन्मजात लिव्हरचा आजार मुलाच्या वाढीवर अनेक स्तरांवर परिणाम करतो. जेव्हा पित्त प्रवाह (Cholestasis) विस्कळीत होतो, तेव्हा आतडे चरबी (Fat) आणि चरबीमध्ये विरघळणारी जीवनसत्त्वे—जसे की A, D, E आणि K—योग्यरित्या शोषू शकत नाहीत. यामुळे वजन वाढण्यास अडचण, उंची खुंटणे आणि हाडे कमकुवत होणे यांसारख्या समस्या उद्भवतात.

पोटात द्रव (Fluid) साठल्यामुळे आणि प्लीहा (Spleen) वाढल्यामुळे मुलाला सतत जडपणा जाणवतो. सतत खाज सुटणे आणि थकवा यामुळे त्यांची झोप आणि खेळण्यावरही परिणाम होतो, ज्यामुळे त्यांचा सर्वांगीण विकास थांबतो.

## थोडक्यात पण महत्वाचे

### धनराज जोरी यांची किल्ले सिंहगडावरून प्रचाराला सुरुवात



**सिंहगड (आरंभ पर्व) :** किल्ले सिंहगडावर जाऊन नरवीर तानाजी मालुसरे यांच्या शौर्य, त्याग आणि कर्तव्यनिष्ठेपासून प्रेरणा घेत धनराज किसन बापू जोरी यांनी आपल्या प्रचाराची औपचारिक सुरुवात केली. तानाजी मालुसरे यांच्या जीवनमूल्यांचा. त्याग, निष्ठा आणि शौर्याचा. आदर्श समोर ठेवत समाजासाठी अधिक योगदान देण्याची प्रेरणा मिळाल्याची भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली. "इतिहासातील महान व्यक्तींच्या विचारांतूनच आजच्या समाजसेवेचा मार्ग मिळतो," असे सांगत धनराज जोरी यांनी जनतेशी प्रामाणिकपणे जोडलेले नेतृत्व देण्याचा संकल्प व्यक्त केला. या वेळी सुदाम सुर्वे, मोहन भालेराव, विपुल जोरी यांच्यासह अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.सिंहगड पंचक्रोशीतील विविध गावांना भेटी देत धनराज जोरी नागरिकांशी थेट संवाद साधत असून, स्थानिक प्रश्न, विकासाच्या अपेक्षा आणि लोकांच्या भावना जाणून घेत आहेत. त्यांच्या या प्रचाराला पंचक्रोशीतून सकारात्मक प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

### हलगीच्या तालात प्रभाग ९ मध्ये राहुल भोसले यांचा प्रचार प्रारंभ



**पिंपरी चिंचवड (आरंभ पर्व) :** पिंपरी चिंचवड शहरातील राष्ट्रवादीचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या प्रभाग क्रमांक ९ मध्ये राष्ट्रवादी अजित पवार गटाचे पॅनल प्रमुख राहुल हनुमंतराव भोसले यांनी आज अधिकृतपणे प्रचाराचा शुभारंभ केला. पारंपरिक पद्धतीने हलगी वादकांच्या तालावर तरुण, महिला आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहायला मिळाला. यावेळी बोलताना राहुल भोसले म्हणाले की, ही निवडणूक केवळ विकासाच्या मुद्द्यावर लढवली जाईल. कोणत्याही प्रकारचे गटातटाचे किंवा द्वेषाचे राजकारण होणार नाही, अशी ठाम ग्वाही त्यांनी मतदारांना दिली.

## वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ संपन्न




**सिंहगड (दै. आरंभ पर्व)**

खानापूर येथील पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या इंग्लिश मिडीयम प्री प्रायमरी स्कूल चे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ उत्साहाने संपन्न झाले. स्नेहसंमेलनाचे उदघाटन माजी सरपंच शरद जावळकर,शशिकांत किवळे (अध्यक्ष,राष्ट्रवादी काँग्रेस ग्रामीण खडकवासला),मुख्याध्यापक शिवराम साबळे,वृत्तपत्र लेखक व माजी शिक्षक शशिकांत जाधव,उपसरपंच प्रियांका जावळकर,अंकुश जावळकर यांचे हस्ते झाले.इंग्लिश मीडियम प्री प्रायमरी स्कूलने आयोजित केलेल्या विविध स्पर्धेतील पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांचे शरद जावळकर, शशिकांत किवळे,शिवराम साबळे व शशिकांत जाधव यांनी कौतुक करुन वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त शुभेच्छा दिल्या. मुख्याध्यापक शिवराम साबळे व विभाग प्रमुख अंजना जावळकर यांनी मान्यवरांचे स्वागत केले.प्ले ग्रुप,ज्युनियर व सिनिअर के.जी. च्या मुलांनी तसेच महात्मा गांधी विद्यालयाचे विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर करुन उपस्थितांची मने जिंकली.वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ यशस्वी करण्यासाठी माजी सरपंच शरद जावळकर,शशिकांत किवळे,माजी शिक्षक व वृत्तपत्र लेखक शशिकांत जाधव,अंकुश जावळकर,सचिन यादव,रोहन जावळकर यांनी विशेष योगदान दिले.प्रमुख पाहुणे म्हणून खानापूर चे माजी सरपंच शरद जावळकर, खडकवासला युवक राष्ट्रवादी काँग्रेस ग्रामीण चे अध्यक्ष शशिकांत किवळे, मुख्याध्यापक शिवराम साबळे, वृत्तपत्र लेखक व माजी शिक्षक शशिकांत जाधव,उपसरपंच प्रियांका जावळकर,काळभैरवनाथ पतसंस्थेचे संस्थापक रघुनाथ यादव,माजी उपसरपंच अमित पवार, सामाजिक कार्यकर्ते प्रमोद जावळकर, सचिन यादव,रोहन जावळकर,अंकुश जावळकर,आकाश जावळकर,आत्माराम जावळकर,जेष्ठ लेखनिक रायबा कुंभार आदी मान्यवरांचे हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. विभाग प्रमुख अंजना जावळकर,प्रियंका जावळकर,पूजा पवार यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन केले.

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
सिंहगड रोड भागातील जनतेचा आवाज.. इथं आहे जनहिताचे सर्व आरंभपर्व
गाव तेथे वार्ताहर
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा,तालुका, शहर आणि ग्रामीण भागात
वार्ताहर/पत्रकार आणि जाहिरातदार नेमणे आहेत.
या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधीना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.
* पात्रता *
१.समाजसेवेची आवड
२.जनसंपर्क
३.स्मार्ट फोन असणे आवश्यक
४.सोशल मीडियाचा वापर करता येणे
दै.आरंभपर्व मीडिया समूह 7276314142 / 9284559577 / 8605284272

## अजून जरा हसा...




# रांजणगाव एमआयडीसीतील गोदाम फोडून ६८ लाखांची चोरी



### ७२ तासांत गुन्हा उघडकीस, मुद्देमाल जप्त

**रांजणगाव (दै. आरंभ पर्व)**

रांजणगाव एमआयडीसी परिसरातील एका गोदामामधून बिस्किटे, साबण, सिगारेट व इतर वस्तूंची मोठ्या प्रमाणावर चोरी केल्याप्रकरणी रांजणगाव एमआयडीसी पोलिसांनी अवघ्या ७२ तासांत चोरीचा गुन्हा उघडकीस आणत सुमारे ६८ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

रांजणगाव एमआयडीसी हद्दीतील शिरूर तालुक्यातील गोदामामध्ये विविध कंपन्यांचे सिगारेट, बिस्किटे, साबण यांचा साठा ठेवण्यात येत होता. हा माल ट्रान्सपोर्टच्या वाहनांमधून इतर ठिकाणी पाठविण्यात येत असे. दरम्यान, दि. १७ डिसेंबर २०२५ रोजी पहाटे सुमारे ६.४० वाजता गोदामातून माल भरलेला एक इलेक्ट्रिक पिकअप वाहन चोरीला गेल्याचे निदर्शनास आले. याप्रकरणी तपास करत असताना ६५,९८,८९७ रुपये किमतीचा सिगारेट व इतर माल चोरीला गेल्याचे निष्पन्न झाले.

या प्रकरणी रांजणगाव एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेता पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल (पुणे ग्रामीण) यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक तयार करण्यात आले. पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे यांच्या नेतृत्वाखाली तपास पथकाने तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही फुटेज व गोपनीय माहितीच्या आधारे आरोपींचा माग काढला.

तपासादरम्यान चोरीसाठी वापरण्यात आलेले वाहन रांजणगाव परिसरातच असल्याचे निष्पन्न झाले. पुढील तपासात आरोपींच्या हालचालींबाबत माहिती मिळवून प्रदीप झांडेकर व अल्ताफ आयुब मुळता या दोन आरोपींना अटक करण्यात आली. त्यांच्या ताब्यातून ५४,५३,००० रुपये किमतीचे सिगारेट जप्त करण्यात आले.

तपासात असेही निष्पन्न झाले की, या टोळीने चोरीसाठी वापरलेले वाहन चोरीचेच असून, रोडवरील सुमारे १५ सीसीटीव्ही कॅमेरे बंद करून गुन्हा केल्याचे उघड झाले आहे. आरोपींकडून चोरीस गेलेला एकूण मुद्देमाल व गुन्ह्यात वापरलेले वाहन मिळून एकूण ६८ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास रांजणगाव एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अविनाश थोरात करत असून, या टोळीशी संबंधित इतर दोन आरोपींचा शोध सुरू आहे. आरोपींवर यापूर्वीही शिक्रापूर, शिंगारगाव, लोणीकंद व इतर पोलीस ठाण्यांत एकूण ८ गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिस तपासात पुढे आली आहे.

या कारवाईत पोलीस उपअधीक्षक, पोलीस निरीक्षक व तपास पथकातील अधिकारी-कर्मचाऱ्यांचे विशेष योगदान लाभले असून, ही कामगिरी पुणे ग्रामीण पोलिसांच्या कार्यक्षमतेचे उदाहरण ठरत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे




### वडगाव शेरीत शिवसेना शिंदे जागा द्यावी : उध्दव गलांडे

पुणे/ वडगाव शेरी (आरंभ पर्व) : वडगाव शेरी प्रभाग पाच मध्ये शिवसेनेने अनेक वर्ष प्रतिनिधत्व केले आहे. या प्रभागात शिवसेना (शिंदे गटाची) ताकद आहे. यामुळे या प्रभागात किमान दोन जागा शिवसेना शिंदे गटासाठी द्याव्यात अशी मागणी शिवसेना उपशहर संघटक उध्दव गलांडे यांनी पत्रकार परिषदेत केली. पुणे महापालिका निवडणुकीसाठी भाजप– शिवसेना युती असली, तरी जागावाटपात शिवसेना शिंदे गटाला कमी जागा दिल्या जाणार असल्याच्या चर्चांमुळे पक्षात अस्वस्थता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर वडगाव शेरी मधील शिवसैनिक (शिंदे गट)शिवसेना पुणे शहर उपशहर संघटक उद्धव गलांडे यांच्या संपर्क कार्यालयात आज आयोजित पत्रकार परिषदेत ही मागणी मांडण्यात आली. या पत्रकार परिषदेला छाया रविंद्र गलांडे, रमेश साळुंके, चेतन गलांडे, शाहरुख कुरेशी, विपुल दळवी, विकास गायकवाड आदी मान्यवर आणि पदाधिकारी उपस्थित होते.

### खेडशिवापूर ८४ गण–४२ गटाचा स्नेहमेळावा १ जानेवारीला

खानापूर (आरंभ पर्व) : खडकवासला विधानसभा मतदारसंघातील खेडशिवापूर ८४ गण व ४२ गटाचा स्नेहमेळावा गुरुवार, दि. १ जानेवारी २०२६ रोजी रात्री ७ वाजता आयोजित करण्यात आला आहे. मातोश्री मंगल कार्यालय, खानापूर येथे होणाऱ्या या मेळाव्यात कार्यकर्ते, पदाधिकारी आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. या स्नेहमेळाव्यास खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा. श्री. भीमराव अण्णा तापकीर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असून, भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष मा. श्री. शेखरजी वढणे यांचीही विशेष उपस्थिती असणार आहे. मेळाव्याच्या माध्यमातून कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधत संघटन अधिक मजबूत करण्यावर भर देण्यात येणार आहे.

### स्प्लेंडर कंट्री पॉली हाऊस परिसरात गाय अडकलेली; मदतीची गरज



खडकवासला (आरंभ पर्व) : स्प्लेंडर कंट्री पॉली हाऊस परिसरात एक गाय पडलेल्या अवस्थेत आढळून आली असून तिला उठता येत नाही. गाईचे पाय अडकलेले असल्याने ती पूर्णपणे असहाय्य अवस्थेत आहे. प्राथमिक माहितीनुसार ही गाय किमान दोन दिवसांपासून याच ठिकाणी अडकलेली असण्याची शक्यता आहे. त्यामुळे तिची प्रकृती अत्यंत नाजूक झाली आहे. सदर गाय कोणाची असल्यास संबंधितांनी तात्काळ स्प्लेंडर कंट्री पॉली हाऊस पाशी संपर्क साधावा, तसेच पशुवैद्यकीय मदत उपलब्ध करून द्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे. परिसरातील नागरिकांनीही संवेदनशीलता दाखवत त्वरित मदतीसाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी होत आहे.







# बिडकरांचा नागरिक भेटींचा धडाका

## जनसंपर्क अभियानातून ६० हजारांहून अधिक नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद





**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महानगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी दाखल करण्यास अवघे दोन दिवस उरले आहेत. दुसरीकडे संभाव्य उमेदवारांकडून प्रचाराचा धडका सुरू आहे. पुणे महानगरपालिकेचे भाजपा निवडणुक प्रमुख गणेश बिडकर हे प्रभाग क्रमांक २४ कसबा गणपती - कमला नेहरू हॉस्पिटल - केईएम हॉस्पिटल प्रभागातून लढणार आहेत. बिडकर यांच्या जनसंपर्क कार्यालयातून नागरिकांचे प्रश्न सोडवण्याचे अविरतपणे काम सुरू असताना, दुसरीकडे गेल्या नऊ महिन्यांमध्ये जवळपास 60 हजारांच्यावर नागरिकांची प्रत्यक्ष भेट घेत बिडकर यांनी संवाद साधला आहे.

गेल्या नऊ महिन्यांपासून बिडकर यांनी राबवलेले 'नागरिक जनसंपर्क अभियान' हे केवळ प्रचारापुरते मर्यादित न राहता, थेट जनतेच्या प्रश्नांशी जोडले गेले आहे. या कालावधीत त्यांनी ६० हजारांहून अधिक नागरिकांशी प्रत्यक्ष भेट घेऊन संवाद साधत, प्रभागातील समस्या, अपेक्षा आणि नागरिकांच्या सूचना जाणून घेतला आहे.

दररोज किमान ६० ते ७० घरे आणि २५० ते ३५० नागरिकांना भेटण्याचा शिस्तबद्ध कार्यक्रम राबवण्यात येत असून, या अभियानात पत्नी गौरी बिडकर आणि कन्या पूर्वा यांचाही सक्रीय सहभाग आहे. त्यामुळे हा जनसंपर्क केवळ राजकीय न राहता, विश्वास आणि आपुलकीचा संवाद ठरत असल्याचे चित्र आहे.

प्रभागातील पाणी, आरोग्य, रस्ते, स्वच्छता, प्रशासकीय अडचणी अशा मूलभूत प्रश्नांवर नागरिकांशी थेट चर्चा करून, त्यावर तात्काळ उपाययोजना करण्याचा प्रयत्न या अभियानातून केला जात आहे. त्यामुळे बिडकर यांची "निवडणुकीच्या वेळी दिसणारे उमेदवार" नव्हे, तर सातत्याने नागरिकांमध्ये राहणारे लोकप्रतिनिधी अशी ओळख आणखीन अधोरेखित झाली आहे.

> याबद्दल बोलताना गणेश बिडकर म्हणाले, "नागरिकांना भेटतो, तेव्हा त्यांच्याकडून मला माझ्या कामाचा थेट फीडबॅक मिळतो. तो माझ्यासाठी सगळ्यात मूल्यवान असतो. नागरिक आणि त्यांचे प्रतिनिधी यांच्यामध्ये पारदर्शकता हवी, असे मी मानतो. त्यामुळे आत्तापर्यंत ज्यांना ज्यांना भेटलो आहे, त्यांच्याकडून मिळालेल्या प्रतिक्रिया ऐकून आपले काम नागरिकांपर्यंत पोहोचलेले आहे, याचे समाधान आहे".

# मंदोशी येथे प्राध्यापकाची आत्महत्या

**राजगुरुनगर-किरण खुडे (दै. आरंभ पर्व)**



राजगुरुनगर येथील एका महाविद्यालयातील प्राध्यापकांनी मंदोशी (ता. खेड) येथे विहिरीत उडी मारून आत्महत्या केली. ही घटना शुक्रवारी (दि. २६) उघडकीस आली. प्रा. भानुदास मोतीलाल परदेशी (वय ५२, रा. मोशी शिवालय अपार्टमेंट, इंद्रायणी कॉलनी, ता. हवेली) असे त्यांचे नाव आहे. त्यांच्या आत्महत्येचे कारण समजू शकले नाही. खेड पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, परदेशी हे राजगुरुनगर येथील त्यांच्या अध्यापनाचे काम संपवून महाविद्यालयातून बुधवारी (दि. २४) दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास दुचाकीवरून गेले. त्यानंतर त्यांचा संपर्क होऊ शकला नाही. ते बेपत्ता झाल्याची शक्यता गृहीत धरून त्यांचा सर्वत्र शोध घेण्यात येत होता. गुरुवारी (दि. २५) रात्री आठ वाजण्याच्या सुमारास खेड तालुक्याच्या पश्चिम भागातील मंदोशी येथील भैरवनाथ मंदिराच्या शेजारी असलेल्या विहिरीच्याजवळ त्यांची मोटारसायकल, काळ्या रंगाची बॅग व चपला आढळल्या. खेड पोलिस व ग्रामस्थांच्या मदतीने त्यांचा विहीरीत शोध घेतला असता पहाटे दोन वाजण्याच्या दरम्यान परदेशी यांचा मृतदेह आढळला. यावरून त्यांनी आत्महत्या केल्याचे सांगितले जाते. प्रा. परदेशी हे गेल्या बावीस वर्षांपासून येथील महाविद्यालयात जीवशास्त्र हा विषय शिकवित होते. त्यांच्या अचानक जाण्याने सर्वजण हळहळ व्यक्त होत आहे.

# भाजपमध्ये बंडखोरी होण्याची शक्यता

## अनेक प्रभागात 'निष्ठावंत' नाराज

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्यात गेल्या काही दिवसांपासून घटक पक्षांकडून भाजपवर नाराजी व्यक्त केली जात आहे. शिवसेना भाजप युतीचा अद्याप जागावाटपचा तिढा सुटलेला नाही. अशातच, भाजपमध्ये बंडखोरी होण्याची शक्यता राजकीय गोटात वर्तवण्यात येत आहे.पुण्यात भाजपनं १६५ पैकी १०० जागा लढवण्याची तयारी केली असून ६० पेक्षा जास्त जागांवर उमेदवारांना एबी फॉर्म दिला आहे. आज प्रभाग २४ मधून भाजपचे पुणे निवडणूक प्रमुख गणेश बिडकर यांनी आज मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थित पहिला अधिकृत अर्ज दाखल केला. तर भाजपने काही दिवंगत नेत्यांच्या घरातील सदस्यांना उमेदवारी जाहीर केली आहे. यात दिवंगत खासदार गिरीश बापट यांची सून आणि दिवंगत आमदार मुक्ता टिळक यांच्या मुलाचा समावेश आहे.

गिरीश बापट यांची सून स्वरदा बापट यांना उमेदवारी देण्यात आली आहे. तर मुक्ता टिळक यांचे पुत्र कुणाल टिळक यांनाही तिकिट दिलं आहे. दोघेही पुण्यातील प्रभाग क्रमांक २५ मधून उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. दरम्यान, एका कार्यकर्त्यांची पोस्ट चांगलीच चर्चेत आली आहे. उमेदवारी न मिळाल्याने त्यांनी उघडपणे नाराजी व्यक्त केली आहे. "निष्ठा, प्रामाणिकपणा आणि त्याग यांना किंमत नसेल, तर कार्यकर्त्यांनी आयुष्यभर झटायचे कशासाठी?" असा सवाल कार्यकर्त्यांने उपस्थित केला आहे.

# महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांना मारहाण

**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**

थकीत वीजबिल न भरल्यामुळे वीजपुरवठा खंडित करण्यासाठी गेलेल्या महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांना मारहाण करण्यात केली. हा प्रकार खेड तालुक्यातील गाडकवाडी येथे घडला. महावितरण कर्मचारी मारहाण प्रकरणी संशयीत संदीप बाळासाहेब सरडे व रामदास बाळासाहेब सरडे या दोघा भावांवर शासकीय कामात अडथळा व मारहाणीचा गुन्हा दाखल केला असल्याची माहिती पोलिस शिपाई भीमा लांडे यांनी दिली. वीज वितरण कंपनीचे वरिष्ठ तंत्रज्ञ अंकुश बोऱ्हाडे (रा. जऊळके) यांनी याप्रकरणी खेड पोलिसांत तक्रार दिली. संशयीत आरोपींचे मृत आजोबा विठोबा तुकाराम सरडे यांच्या नावे गाडकवाडी येथे घरगुती वापराचा वीजमीटर आहे. त्याचे नऊ महिन्यांचे १८१६ रुपयांचे थकीत बिल सुमारे नऊ महीन्यांपासून भरले नव्हते. वरिष्ठांच्या आदेशानुसार, फिर्यादी बोऱ्हाडे व इतर चार कर्मचारी मंगळवारी दुपारी गाडकवाडी येथे त्यांच्या घरी गेले. त्यांनी वीजबिल तत्काळ भरण्याची मागणी केली.

# भीमाशंकर येथे सुरक्षारक्षकांकडून भाविक कुटुंबियांना बेदम मारहाण

## पंतप्रधान मोदींच्या कुटुंबातील सदस्यांकडूनही खाजगी एजंटांनी उकळले होते पैसे

**राजगुरुनगर-किरण खुडे (दै. आरंभ पर्व)**

बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक प्रमुख तीर्थक्षेत्र असलेल्या भीमाशंकर (ता. खेड) येथे पुणे येथील एका कुटुंबांतील तिघांना सुरक्षारक्षकांनी बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. याप्रकरणी खेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, संशयीत आरोपींमध्ये एक निळा शर्ट आणि काळे जॅकेट घातलेल्या वर्णनाचा व्यक्ती तसेच इतर सात सुरक्षारक्षकांचा समावेश आहे. माया हंबीर लंघे (वय ४८, रा. संघर्ष चौक, चंदननगर, पुणे) यांनी याप्रकरणी खेड पोलिसांत फिर्याद दिली आहे.

याबाबत खेड पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, पुणे येथून बुधवारी (दि. २४) लंघे कुटुंबीय भीमाशंकर येथे देवदर्शनासाठी आले होते. दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास भीमाशंकर देवस्थानातील राम मंदिराजवळ त्यांना सुरक्षा रक्षकांकडून होत असलेल्या धक्काबुक्कीबाबत विचारणा केली होती. यावरून संतापलेल्या आरोपींनी माया लंघे तसेच त्यांचे पती हंबीर लंघे आणि मुलगा राजवर्धन यांना हाताने व लाथाबुक्यांनी बेदम मारहाण केली, याशिवाय अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून फिर्यादींचा मोबाईल जमिनीवर आपटून फोडण्यात आला. या प्रकरणी खेड पोलीस ठाण्यात विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून संशयीत आरोपींमध्ये निळा शर्ट व काळे जॅकेट घातलेली, कानात बाळी घातलेली एक व्यक्ती, चार पुरुष सुरक्षारक्षक आणि व तीन महिला सुरक्षारक्षक यांचा समावेश असून, त्यांची पूर्ण नावे आणि माहिती अद्याप उपलब्ध नाही. घटनेच्या वेळी देवस्थान परीसरात भाविकांची मोठी गर्दी होती. पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली असून, संशयीत आरोपींचा शोध सुरू आहे. या घटनेमुळे भाविकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. काही महिन्यांपूर्वी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कुटुंबातील सदस्यांकडून भीमाशंकर मंदिरात दर्शनासाठी जाण्यासाठी खाजगी एजंटांनी पैसे उकळल्याचा प्रकार घडला होता. आता भाविकांना थेट मारहाण करण्यापर्यंत व दहशत निर्माण करण्यापर्यंत मजल गेली आहे का ? अशा संतप्त प्रतिक्रिया भाविकांकडून येत आहेत.

# फोडाफोडीचे राजकारण आणि पुण्याची राजकीय घसरण

## महाविकास आघाडी "व्हेंटिलेटरवर", तर पुण्याचे राजकारण कुंटणखान्याच्या उंबरठ्यावर ?




• दत्ता जोरकर •

माजी सदस्य, पंचायत समिती, हवेली

(सिंहगड, पुणे)

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या सध्याचे याच फोडाफोडीच्या राजकारणामुळे पुण्यातील महाविकास आघाडी अक्षरशः "व्हेंटिलेटरवर" गेल्याचे चित्र दिसत असून सत्ताधारी भाजपाकडून प्रतिस्पर्धी शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेस (आय) यांच्यात सातत्याने फूट पाडण्याचे राजकारण सुरूच असून, या धक्क्यांतून आघाडीची एकजूट कोलमडली असली तरी दुसरीकडे, सत्तेच्या राजकारणात मूळ भाजपाचा निष्ठावंत कार्यकर्ता आणि पदाधिकारी देखील "वनवासी "ठरू लागल्याने बाहुबली भाजपातही पक्षांतर्गत अस्वस्थता वाढतच चालली आहे . सत्तेसाठी जे करता येईल ते करुन यश मिळविले तरी याच राजसत्तेच्या छत्राखाली न येणाऱ्या प्रामाणिक कार्यकर्त्यांचा राजकीय बळी जात असल्याने, याचे अनपेक्षित परिणाम आता खुद्द सत्ताधाऱ्यांनाही भोगावे लागतील, अशी भीती देखील निर्माण झालेली आहे. पक्षीय धोरणे, राजकीय भूमिका आणि विचारसरणी बाजूला ठेवून केवळ सत्तेसाठी आपल्याच पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्त्यांना डावलण्याचा नवा ट्रेंड सर्वच राजकीय पक्षांनी स्वीकारल्याचे चित्र पुण्यात तरी दिसत आहे. संस्कृतीचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्याच्या महानगरपालिकेच्या राजकारणाचा दर्जा इतका घसरला आहे की, तो जणू राजकीय कुंटणखान्यातच परिवर्तित झाल्याची भावना सामान्य मतदार आणि पुणेकरांच्या मनात होऊ लागली आहे. याचा थेट परिणाम म्हणजे सामान्य मतदारांमध्ये राजकीय पक्ष व पक्षाचे नेत्यांविषयी नाराजी आणि वाढत चाललेला तिरस्कार... आज समाजकारण आणि राजकारणाचे सर्रास बाजारीकरण झाले असून, निष्ठावंत कार्यकर्ते आज एका पक्षात आणि उद्या दुसऱ्या पक्षात दिसू लागले आहेत. ऊन-वाऱ्याची दिशा बदलते तसे विचार आणि निष्ठा क्षणा क्षणाला बदलण्याची ही प्रवृत्ती पुण्याच्या राजकारणाचा अक्षरशः चोथा करणारी आहे. या साऱ्या घसरणीच्या पार्श्वभूमीवर कलाकार गौतमी पाटील यांचे उदाहरण अधिक ठळक ठरते. कलेच्या माध्यमातून व्यावसायिक हेतूने नृत्य सादर करणाऱ्या गौतमी पाटील यांच्यावर नैतिकतेचे डोस देणारे अनेक राजकीय नेते आणि कार्यकर्ते आज स्वतःच्या वर्तनामुळे अगदी तिचे समोर तोंड उघडू शकत नाहीत.

हजारो लोकांसमोर आपली कला सादर करूनही, काही नाठाळ टीका-टिप्पणींमुळे कोणतीही चूक नसताना तिने जाहीर दिलगीरी व्यक्त केली या बद्दल तिला बिचारीला देखील आता खंत वाटावी अशीच आजची परिस्थिती आहे. जिची कला आणि संस्कार व्यावसायिक चौकटीत योग्य ठरतात, ती गौतमी पाटील आज या बेभरवशाच्या राजकारणी नेते आणि पक्षांच्या वर्तनापेक्षा कितीतरी पटीने प्रामाणिक ठरते, हेच कटू सत्य आहे.

पक्षाचे विचार आणि पक्ष निष्ठेवर उभे असलेले पुतळे संभाव्य

बंडखोरीत तग धरू शकतील का ? याची देखील शाश्वती देता येणार नाही. पाच - दहा वर्षे निष्ठेचे प्रतीक मानले जाणारे हेच राजकीय पुतळे उमेदवारीच्या आशेवर क्षणार्धात वितळताना दिसत आहेत आणि बदलत्या नेतृत्वासमोर मौन बाळगून हाच सामान्य कार्यकर्ता आणि मतदारांवर मात्र आक्रोश करण्याची वेळ आली आहे .

निवडणुकीतले जाहीरनामे आणि आश्वासने विसरून, अमिर खानच्या "गजनी चित्रपटासारखी" हुबेहूब भूमिका केवळ कार्यकर्तेच नव्हे तर राजकीय पक्षही अगदी सुरेख पद्धतीने बजावताना दिसत आहेत. सध्याचा याच फोडाफोडीच्या राजकारणाने पुणे महापालिकेचे राजकीय चित्र पूर्णपणे बदलत चालले असुन परिस्थिती हाताबाहेर गेल्यास अपक्ष आणि बंडखोरांचा उदय ? उदय होऊ शकतो.

महाविकास आघाडी संभाव्य आव्हान ठरू शकते या भीतीने सुरू झालेल्या फोडाफोडीत, बुडत्या जहाजावरून उंदीर पळावेत तसे अनेक इच्छुकांनी पक्षांतर केले. मात्र पुढे काय, हा प्रश्न कायम आहे.

जर नाराज कार्यकर्ते आणि मतदारांनी आयारामांना "कात्रजचा घाट" दाखवण्याचा निर्धार केला, तर दोन-तीन डझन अपक्ष किंवा बंडखोर नगरसेवक महापालिकेत निवडून येणे अशक्य नाही. मागील काही दिवसांत सोशल मीडिया, माध्यमे आणि चौकातील कट्ट्यांवर उमटणारा जनतेचा सूर पाहता, हे चित्र नाकारता येणार नाही.

पुणे शहराच्या या राजकारणाची ही परिस्थिती कोणत्याही एका पक्षापुरती मर्यादित नाही. आत्मघातकी राजकारण करून कार्यकर्ता आणि मतदारांच्या स्वाभिमानावर घाव घालणाऱ्या प्रत्येक पक्षाला याची मोठी किंमत मोजावी लागू शकते. येणाऱ्या काळात पुण्याच्या राजकारणाची दिशा बदलते की अधिक गढूळ होते, हे येणारा काळ ठरवेल. मात्र सामान्य पुणेकर आणि मतदार आता गप्प बसणार नाहीत, एवढे मात्र निश्चित.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.